**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दुरध्वनी क्र. -०२२ २२०४ ८७८९** **Email:pawankumar.bandgar@nic.in**

**File No.: MTD-36024/47/2025-MTD(Desk15)** **दिनांक: १४ जुलै, २०२५.**

प्रति,

१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२) सर्व अपर आयुक्त,आदिवासी विकास.
३) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**विषय:** आदिवासी भागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत.

**संदर्भ:** १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०२/१९९९.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२.

महोदय / महोदया,

आदिवासी विकास विभांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भाधीन क्र. २ व ३ येथील शासन निर्णयातील तरतुदींन्वये ६/७ व्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा अदा करण्याच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०२/१९९९ अन्वये **आदिवासी उपयोजना क्षेत्रात** कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यात आला असून, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२ अन्वये प्रोत्साहन भत्त्याशी संबंधित सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, प्रोत्साहन भत्ता मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेता, सद्यस्थितीत ***आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचारी*** यांना ६/ ७ व्या वेतन आयोगातील मूळ वेतनावर १५% इतका किमान रु. २००/- व कमाल रु. १५००/- दरमहा या मर्यादेत सुधारित दराने प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

**४.** सबब, परि. क्र. ३ येथे नमूद केल्याप्रमाणे संबंधितांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही करावी तसेच त्याबाबतची थकबाकी देय असल्यास ती नियमानुसार अदा करण्यात यावी, ही विनंती.

**आपला,**

PAWANKUMAR
BAPURAO
BANDGAR

Digitally signed by PAWANKUMAR BAPURAO BANDGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=03c3c62c2ef482c6f6b1ec581e7ff012104aacd8b9
44baed6bd52110b37bfbe5, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=DDD9DA8FA21A90D7D094A7A2B297309E
ED70A74C6C632CA84301EB132C1FB5FD,
cn=PAWANKUMAR BAPURAO BANDGAR
Date: 2025.07.14 18:20:26 +05'30'

**(पवनकुमार बंडगर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**